नि.फौ.ख.क्र.३२४७/२०१९
सरकार वि. इंद्रकुमार
नि. क्र.६

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ साक्षीदार**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव : दिलीप आसाराम हुड,**
**वय : ६३ वर्षे,**
**व्यवसाय : सेवानिवृत्त,**
**राहणार : महाल, झेंडा चौक, नागपूर.**

**सरकारी पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी वकील ममता आवारीवार यांच्यामार्फत शपथेवर सुरूः**

**०१.** सन २०१८ मध्ये मी पोलीस स्टेशन यशोधरा येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक रात्रपाळी डयुटी अधिकारी म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी गुन्हा रजीस्टेशन क्र.१६९/२०१८ मध्ये फिर्यादी नामे शेख शहारूख याने भादंवि कलम ३२४, ४२७, ५०४, ३४ अंतर्गत गुन्हा आरोपी प्रथम दिवानजी व नंतर इंद्रकुमार शाहू, शर्मा, चंद्रकुमार शाहू यांच्या विरूध्द दिली. सदरची फिर्याद मी नोंदविली. फिर्यादीनुसार फिर्यादी त्याच्या मोटरसायकलने निरंजन हॉल, टिपु सुलतान चौक येथे चालला होता. त्यावेळी त्याला तेथे गर्दी दिसली. तो तेथे पाहत असतांना आरोपीने त्याला इकडे काय बघतो असे म्हणून शिवीगाळ केली. त्यापैकी एका इसमाने लाकडी दांडयाने फिर्यादीला मारहाण केली. मारहाणीमध्ये फिर्यादीच्या डोळयाच्या वर डोक्याला मार लागला व आरोपींनी गाडीचे लाकडी दांडयाने मारून तोडफोड केली. आता मला दिनांक ०१.०७.२०१८ रोजीची छापील फिर्याद व

रिपोर्ट दाखविण्यात आला. सदरचा रिपोर्ट व फिर्याद माझया समक्ष नोंदविण्यात आली. त्यामधील मजकूर फिर्यादीच्या सांगण्यानुसार नोंदविण्यात आला. माझया समक्ष फिर्यादीने त्यावर त्याची सही केली. त्यांना अनुक्रमे **निशाणी क्र.पी–६, ७/सा.क्र.१** देण्यात येते. त्याच दिवशी मी फिर्यादीच्या सांगण्यानुसार घटनास्थळी जावून पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला दिनांक ०१.०७.२०१८ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची स्वाक्षरी असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.पी–८/सा.क्र.१** देण्यात येते. घटनेला बराच काळ उलटल्याने आरोपींना पाहिल्यास ओळखू शकेन किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. घटनेबाबत पुढील तपासाबाबत माझा काही संबंध आला नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विद्यीज्ञ श्रीमती व्ही. एस. जांभूळकर यांच्यामार्फत–**

**०२.** मी फिर्याद नोंदविताना पोलीस स्टेशन मध्ये कर्तव्यावर हजर होतो याबाबत दोषारोपपत्रामध्ये कोणताही कागद समाविष्ट करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने प्रथम आरोपीचे नाव दिवानजी असे सांगितल्याप्रमाणे मी रिपोर्ट मध्ये आरोपीचे नाव दिवानजी नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने दिलेल्या रिपोर्ट मध्ये प्रस्तुत आरोपींची नावे नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने नोंदविलेल्या रिपोर्ट मध्ये गाडीच्या नंबर मध्ये खाडाखोड आहे. मी पंचांना पंच म्हणून काम पाहण्यासाठी कोणतेही सुचनापत् दिलेले नव्हते. मी केवळ तोंडी विनंती केली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामध्ये देखील खाडाखोड करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा पोलीस

स्टेशन मध्ये बसूनच बनविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामध्ये नमूद केलेल्या सर्व बाबी खोटया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत आरोपींची नावे छापील फिर्याद मध्ये देखील नमूद केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना खोटया गुन्हयात गोवण्यासाठी मी खोटी फिर्याद नोंदवून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**
**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

KAUSTUBH NAGESH MARATHE

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2025.08.08 13:16:04 +0530

**नागपूर.**
दि. ०८/०८/२०२५

**(कौस्तुभ नागेश मराठे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर
कोर्ट क्र.१